# श्रीगुरुमाईंच्या वचनांवर ध्यान

## *महाशिवरात्री*

## ईशा सरदेसाई यांच्याद्वारे लिखित

### “मागाल तर तुम्हाला मिळेल”

श्रीगुरुमाईंनी “दर्शन बुक” करण्याची इच्छा असलेल्या त्या सात वर्षांच्या मुलीबरोबर घडलेला प्रसंग सांगितला व त्यानंतर, त्यांनी आणखी एक शिकवण दिली, जी या प्रसंगाद्वारे स्पष्ट होते.

श्रीगुरुमाई म्हणाल्या, “मागाल तर तुम्हाला मिळेल. आपल्या सर्वांना हे माहीत आहे. प्रत्येक परंपरेत हे सांगितले गेले आहे. हे हिंदू परंपरेत आहे, ख्रिश्चन परंपरेत आहे, यहुदी परंपरेत आहे आणि मुस्लीम परंपरेत आहे. प्रत्येक परंपरेत, प्रत्येक धर्मात, सत्य एकच आहे.”

श्रीगुरुमाईंनी जेव्हा हे सांगितले, तेव्हा माझे मन जणूकाही प्रकाशित झाले; हे अतिप्राचीन प्रज्ञान पुन्हा नव्याने उजळले. “मागाल तर तुम्हाला मिळेल,” हे विधान बायबलमधील ज्या उताऱ्यातून घेतले आहे, त्या उताऱ्याशी मी काही अंशी परिचित होते. भगवान शिवाबद्दल मी ज्या कथा आणि शास्त्रग्रंथ वाचले आहेत, त्यांमध्ये मी याविषयी निश्चितच वाचले आहे. आणि माझ्या अध्ययनातून तसेच इतरांशी झालेल्या माझ्या संभाषणांमधून मला हे ठाऊक होते की, इस्लाम आणि यहुदी धर्मग्रंथांमध्येही हीच भावना प्रतिबिंबित होते. परंतु श्रीगुरुमाईंनी जोपर्यंत सत्संगात याविषयी सांगितले नव्हते, तोपर्यंत मी *या* सिद्धान्तावर, *या* मुख्य विषयाच्या महत्त्वावर विचार केला नव्हता, याचे मूल्य जाणले नव्हते, ज्याचा उल्लेख जगातील *सर्व* मुख्य धार्मिक व आध्यात्मिक परंपरांमध्ये केलेला आहे.

आपण कोणत्याही परंपरेचे अनुसरण करण्याची जरी निवड केली, तरी आपला प्रयत्न हाच अत्यंत महत्त्वाचा समजला जातो, या तथ्याद्वारे आपण काय शिकू शकतो? यहुदी आणि ख्रिश्चन बायबल, कुराण आणि भारताचे असंख्य शास्त्रग्रंथ भगवंताच्या कल्याणकारी कृपेचे स्तुतिगान करतात. तथापि, ते *हेदेखील* स्पष्ट करतात की, भगवंताच्या दिशेने पहिले पाऊल हे साधकालाच उचलावे लागेल. त्याला काय हवे आहे, हे त्याने स्पष्ट शब्दांमध्ये व्यक्त करायला हवे.

सिद्धयोग मार्गावर, श्रीगुरुमाईंनी प्रार्थनेच्या शक्तीविषयी विस्तारपूर्वक शिकवले आहे. प्रार्थना करणे हे एक अत्यंत पावन कृत्य आहे ज्यामध्ये आपण देवाशी बोलतो, देवाची याचना करतो, त्याच्याशी संवाद साधतो, त्याच्याशी सख्य साधतो. प्रार्थना हा मुळातच एक अभ्यास आहे, हे एक असे कृत्य आहे, जे मनाची आकलनशक्ती आणि हृदयाचे अंगभूत ज्ञान यांना एक करते. एक प्रार्थना व्यक्त करण्यासाठी बरेच काही लागू शकते. प्रार्थना करणे म्हणजे इतकेच नव्हे, की देवाला साष्टांग नमस्कार करून अशी आशा करणे की, बाकी सर्वकाही देव सांभाळून घेईल, तर प्रार्थना करणे याहूनही अधिक असते. प्रार्थना करणे याचा अर्थ हादेखील नाही की, आपण ते बोलावे, जे आपल्याला 'बरोबर' वाटते, जे ऐकायला चांगले वाटते किंवा आपल्याला वाटते की, देवाला आपल्याकडून हेच ऐकायचे आहे.

एक खरी प्रार्थना म्हणजे आपला आत्मा परमोच्च आत्म्यामध्ये विलीन होणे, तो आत्मा जो आपल्या सभोवताली सर्वत्र स्पंदित होत असतो. आणि खरी प्रार्थना करण्यासाठी, प्रथम आपल्याला *ऐकावे* लागेल—उदाहरणार्थ, आपल्याला ऐकावा लागेल बालकांच्या पावलांचा आवाज किंवा आपल्या खिडक्यांच्या आजूबाजूला शीळ घालणाऱ्या वाऱ्याचा आवाज. आपल्याला ऐकावा लागेल कम्पूटरच्या कीबोर्डवर सतत चालणाऱ्या बोटांनी होणारा टक-टक ध्वनी आणि एका तापलेल्या शेगडीवरील उकळत्या आमटीचे खळखळणे. जे स्पंदन आपण शोधत आहोत, ते *प्रत्येक* ध्वनीमध्ये सामावलेले आहे—त्या ध्वनींमध्येदेखील की, ज्यांना आपण सर्वसाधारण ध्वनी समजतो आणि त्या ध्वनींमध्येदेखील की, ज्यांना आपण दिव्यतेची मूळ स्पंदने समजतो.

तथापि, आपल्याला वैयक्तिक आवडीनिवडीही लक्षात घेतल्या पाहिजेत. प्रत्येकाचे शरीर निरनिराळे असते. आपल्या मज्जासंस्थेची म्हणजेच नर्व्हस सिस्टीमची संवेदनशीलता वेगवेगळी असते. काही ध्वनी आपल्या मनाला शांतता देणारे असतात तर काही ध्वनी कर्कश असतात, जे आपल्यासाठी त्रासदायक असतात. हे जाणून घेणे माझ्यासाठी सहाय्यकच नव्हे, तर महत्त्वाचेसुद्धा ठरले आहे की, ते कोणकोणते आवाज आहेत जे मला आवडतात आणि कोणत्या प्रकारच्या गोंगाटाने मला त्रास होतो व मी स्वतःला त्यापासून दूर ठेवायला हवे. आपल्याला जर हेच माहीत नसेल की, आपल्या शरीराला काय आवडते आणि काय आवडत नाही, तर मग आपण भगवंताची अनूभूती करण्यासाठी या शरीराचा उपयोग कसा काय करू शकणार? याऊलट, आपण जर स्वतःच्या बाबतीत ही प्रक्रिया केली, आपण जर हे जाणून घेतले की, आपल्याला काय आवडते आणि आपल्यासाठी काय चांगले आहे, तर आपण ईश्वराला स्पर्श करण्याची अनुभूती करण्याची अद्‌भुत संधी स्वतःला देत असतो.

सरतेशेवटी, एकच ध्वनी आहे जो या जगताच्या मौनातून उदयास आला आहे आणि हा तोच ध्वनी आहे जो वायूमध्ये, लाटांमध्ये आणि आपल्या हृदयाच्या ठोक्यांमध्ये प्रतिध्वनीत होतो आहे. आदिनाद 'ॐ.' आपण जेव्हा हा नाद, हा ध्वनी ऐकण्याचा प्रयत्न करतो, आपल्या शब्दांद्वारे जेव्हा याला अभिव्यक्त करतो, तेव्हा आपल्या प्रार्थना त्याच्या ऊर्जेने ओतप्रोत होतात. त्या प्रार्थनांमध्ये 'ॐ'ची शक्ती असते.

मी निश्चितच मानते की, कदाचित आपल्या प्रार्थना *नेहमीच* या स्थितीतून उद्‌भवत नसतील. कधीकधी आपण अत्यंत निराश-हताश होऊन प्रार्थना करतो किंवा भीतीने अथवा अपराधीपणाच्या भावनेनेसुद्धा प्रार्थना करतो. कधीकधी आपण प्रार्थना करतो, कारण आपल्याला खरोखरच काहीतरी हवे असते. यामुळे स्वतःच्या बाबतीत कठोर होण्याची अथवा स्वतःला दोष देण्याची गरज नाही. आपण मुळात ज्या कोणत्या अस्वस्थतेमुळे प्रार्थना केली असेल, त्यामध्ये *आणखी* अपराधीपणाच्या भावनेची भर घालून, ती अस्वस्थता वाढवायची अजिबात गरज नाही. मी याआधी लिहिले आहे की, आपल्या प्रार्थना तरीही ऐकल्या जातील. भगवान शिवाला 'वरद' म्हणजे वरदान देणारा, 'शंभू' म्हणजे सुख प्रदान करणारा आणि 'करुणानिधी' म्हणजे करुणेचे भांडार असे का म्हटले जाते, यामागे एक कारण आहे.

तथापि, श्रीगुरुमाईंच्या शिकवणींमधून मला हे समजते आहे की, प्रार्थना ही याहून कितीतरी *अधिकदेखील* असू शकते. तिचा अर्थ एखादी इच्छा पूर्ण होणे यापेक्षा कितीतरी अधिक असू शकतो. ती भगवंताची अनुभूती करण्यासाठीचे द्वार उघडू शकते—आणि मग त्या अनुभूतीतून जे शब्द उद्‌भवतात, ते भगवंताच्या इच्छेच्या अनुरूप असतात. माझे मन वर्ष २०२६साठीच्या श्रीगुरुमाईंच्या संदेशाकडे जाते आहे, विशेषतः त्याच्या दुसऱ्या ओळीकडे : "अनुपालन करो! अपने धर्म को निभाओ।" ["पालन करा! तुमचा धर्म पाळा"]. मला ही गोष्ट अतिशय रोचक वाटते की, आपला धर्म काय आहे हे सुनिश्चित करण्यासाठी आणि मग त्याचे पालन करण्यासाठी आपल्याला प्रथमतः स्वतःविषयी, इतरांविषयी आणि या जगाविषयी काही प्रमाणात जागरूकता असणे आवश्यक आहे.

अलीकडेच, मी श्री मुक्तानंद आश्रमात एका मैत्रिणीसोबत होते आणि आम्ही प्रार्थनेविषयीचे आपापले प्रसंग एकमेकींना सांगत होतो. आम्हाला असे आढळून आले की, भगवान नित्यानंदांच्या मंदिरात त्यांच्यासमक्ष जाऊन प्रार्थना करण्याचे आम्हा दोघींचे अनुभव अगदी एकसारखेच आहेत. आम्ही प्रार्थना करण्याआधी *खूपच* विचार करतो की, आपल्याला काय मागायचे आहे. स्वतःच्या इच्छा व्यक्त करण्यासाठी आम्ही *नेमक्या* शब्दांची निवड करतो. इतकेच नव्हे तर, आम्हाला जे शब्द बोलायचे असतात, ते आम्ही पाठदेखील करतो, जेणेकरून प्रार्थना करण्याच्या वेळी, ते आम्हाला अगदी सहज

आठवतील. पण मग, जेव्हा आम्ही बडे बाबांच्यासमक्ष येतो—जेव्हा आमची दृष्टी त्यांच्या स्वर्णिम स्वरूपावर पडते आणि जेव्हा त्यांची कृपामय दृष्टी आमच्यावर पडते, तेव्हा ते शब्द बाहेर पडतच नाहीत, ज्या शब्दांची आम्ही इतक्या काळजीपूर्वक तयारी केलेली असते. त्या शब्दांऐवजी, *दुसरेच* शब्द बाहेर पडू लागतात, असे शब्द की, जे आम्हाला स्वतःलाच आश्चर्यचकित करतात, परंतु त्या शब्दांद्वारे कदाचित ते अधिक अचूकपणे व्यक्त होते, ज्याची आम्हाला खरोखर आकांक्षा असते.

असे माझ्या बाबतीत इतक्या वेळा घडले आहे की, त्याविषयी हसल्याविना मला राहवत नाही. त्याचबरोबर, यामुळे मला अशी इच्छा होऊ लागली आहे की, प्रार्थनेविषयीच्या माझ्या दृष्टिकोणात मी सुधारणा करावी. यामुळे मी स्वतःला अधिक चांगल्या प्रकारे जाणून घेऊ इच्छिते आणि स्वतःशी प्रामाणिक राहू इच्छिते. मी असे मानते की, भावसंवेगांचे तरंग आणि आपल्या विचारसरणीत अधूनमधून येणारा ताठरपणा यांच्या मुळाशी जो प्रामाणिकपणा, जो खरेपणा निहित आहे; त्याच प्रामाणिकपणामुळे व खरेपणामुळे आपण त्या महान सत्यापर्यंत पोहोचतो ज्याविषयी श्रीगुरुमाई आपल्याला सांगत आहेत.

आणि आपल्या प्रार्थना जेव्हा सत्याच्या या स्थानातून उद्‌भवतात, तेव्हा त्या प्रार्थना पूर्ण होणारच, त्याव्यतिरिक्त दुसरा कोणता विकल्पच नाही. जसे की, सिद्धान्त आहे, “मागाल तर तुम्हाला मिळेल.” जे व्हायचेच असते, ते आपण केवळ व्यक्त करत असतो. आपण ती संभावना प्रत्यक्षात आणत असतो, जी आतापर्यंत पूर्ण वेळ कोणताही निश्चित आकार घेतल्याविना वायुमंडलात अस्तित्वात होती. इतकेच नव्हे तर, आपण जगात जे प्रकट करत असतो, त्यामध्ये दीर्घकाळ टिकून राहण्याची शक्ती असते आणि त्यामध्ये तो लाभदेखील असतो, जो केवळ आपल्यापुरताच मर्यादित नसून आपल्या पलीकडेही प्रसरित होतो. होय, प्रार्थनेद्वारे कोणतीही इच्छा पूर्ण होऊ शकते. पण ती इच्छा पूर्ण झाल्याचे समाधान आपण असे किती काळ उपभोगणार, कारण त्याआधीच आणखी एक, मग पुन्हा एक आणि पुन्हा एक इच्छा जागृत होऊन आधीच्या इच्छेची जागा घेते?

माझा हा अनुभव आहे की, हृदयापासून केलेली प्रार्थना अमर्यादपणे फलद्रूप होते. या प्रार्थनेचे अस्तित्व पुढेदेखील टिकून राहते. ती जणूकाही एक ताईत बनते, जी मांगल्याची वृद्धी करते—प्रार्थना करणाऱ्या व्यक्तीसाठीही आणि त्या सर्वांसाठीदेखील ज्यांचे जीवन प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे त्या व्यक्तीच्या प्रार्थनेने प्रभावित झालेले असते. मला महान संत, शिर्डीच्या साईबाबांचे एक प्रसिद्ध कथन आठवते आहे, जे श्रीगुरुमाईंनी अनेकदा उद्धृत केल्याचे मी ऐकले आहे : “मी लोकांना, ते जे इच्छितात ते देतो; या आशेवर की, एक दिवस ते त्याची इच्छा करतील, जे मी त्यांना देऊ इच्छितो.”[१]

तेव्हा आता, मी तुम्हाला विचारू इच्छिते : तुम्ही अशी व्यक्ती आहात का, जिला प्रार्थना करणे आणि प्रार्थना अर्पण करणे लाभदायक वाटते? असे जर असेल तर, तुम्ही तुमच्या आयुष्यात प्रार्थनेची शक्ती कशा प्रकारे अनुभवली आहे, ते कृपया सर्वांना सांगाल का?

© २०२६ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

---

[१] गुरुमाई चिद्विलासानंद यांच्याद्वारे लिखित, ‘अंतःशुद्धीचे सोपान : दिव्य सद्गुणांचा योग’ [चित्शक्ती पब्लिकेशन्स, २०१३] पृ ८८ यामध्ये उद्धृत.